# Author Guide

## मराठीसृष्टीच्या लेखकांसाठी

## वेब पोर्टल वापरण्यासंबंधी मदत करणारी इ-पुस्तिका….



# मराठीसृष्टी वेबपोर्टल

## www.marathisrushti.com

### ठळक वैशिष्ट्ये

- २५ वर्षे कार्यरत असलेले इंटरनेटवरील लोकप्रिय पहिले मराठी वेब पोर्टल.
- ४,५०,००० हून जास्त नोंदणीकृत सभासद
- जगाच्या कानाकोपऱ्यातून हजारोंच्या संख्येने येणारा नियमित वाचकवर्ग. लेखसंग्रह, मराठी व्यक्ती संदर्भ कोश, महासिटीज – ओळख महाराष्ट्राची-भारताची-जगाची, दिनविशेष, मराठीसृष्टी टीव्ही, मराठी व्हिडिओ, मराठी पुस्तके, खाद्ययात्रा, मराठी आडनाव कोश हे मुख्य विभाग
- वाचकांना त्यांच्या प्रतिक्रिया तात्काळ लिहून ऑनलाईन पाठविण्याची सोय
- ३,००,००० हून अधिक मराठी लेखांचा संग्रह असलेले एकमेव मराठी संकेतस्थळ
- प्रतिथयश साहित्यिकांपासून सामान्य माणसापर्यंत अनेकांचे लेखन उपलब्ध
- लेखनासाठी लेखांच्या विषयानुसार विविध विभाग.
- मराठी व्यक्ती कोश, मराठी साहित्यिक कोश आणि मराठी आडनाव कोश हे अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प .
- मराठीसृष्टीद्वारे प्रायोजित **“आम्ही साहित्यिक”** या ग्रुपची सभासदसंख्या जवळपास ७०,०००
- जाहिरातदारांना विविध प्रकारच्या जाहिरात संधी
- मराठी भाषेतील अनेक पोर्टल्सचे नेटवर्क बनविण्यात मराठीसृष्टीचे सहाय्य
- नेटवर्कची एकूण वाचकसंख्या दररोज २००००० हून अधिक

- **अत्याधुनिक सुविधांनी युक्त लेखनमंच**
- **लेखक आणि पत्रकारांना विशेष सुविधा**
- **लेखकांना व्यावसायिक संधी**
- **स्वेच्छानिवृत्तांसाठी आणि सेवानिवृत्तांसाठी आकर्षक योजना**
- **पत्रकारांसाठी आकर्षक योजना... स्वत:चे वृत्तपत्र बनवा.**
- **मराठी व्यावसायिक, पुस्तक प्रकाशक आणि लेखकांसाठी प्रसिद्धी आणि जाहिरात योजना**
- **ब्लॉगधारकांसाठी खास योजना**

**संपर्क:**


## मराठीसृष्टी डॉट कॉम

चाणक्य, २ रा मजला, क्लासिक प्लाझाच्या मागे, गोखले रोड, नौपाडा, ठाणे ४००६०२.

**दूरध्वनी:** / ९८२०३ १०८०३ | **WhatsApp** : 9820310803

**इ-मेल :** support@marathisrushti.com | **वेब :** www.marathisrushti.com

**फेसबुक** : www.facebook.com/marathisrushti

**अनुक्रमणिका :**

लिखाणाला सुरुवात करण्यापूर्वी
नोंदणी प्रक्रिया
लेखक म्हणून नोंदणी करण्याचे फायदे
पोर्टलवर प्रवेश करण्यासाठी ( Log In )
मराठीसृष्टीचा डॅशबोर्ड
लेख लिहिण्यासाठी
पासवर्डमधील बदल
पासवर्ड  विसरलात?
आपल्या लेखांची वर्गवारी
लेखनासाठी योग्य फॉन्ट आणि किबोर्डचा वापर
लेखकाची ओळख – वाचकांसाठी आपल्या प्रत्येक लेखाच्या खाली
प्रकाशित झालेल्या लेखात बदल करण्यासाठी
लेख पाठवण्याचे अन्य मार्ग
मराठीसृष्टीची संपादकीय व कॉपीराईटबाबत धोरणे
सर्वसाधारण प्रश्न
मराठीसृष्टीवर लेखन करण्यासंदर्भातील प्रश्न
मराठीसृष्टीच्या लेखकांसाठी तांत्रिक बाबींविषयी प्रश्न
स्वामित्त्वहक्क (कॉपीराईटस) विषयक प्रश्न
ब्लॉग बनविण्याविषयी प्रश्न
व्यावसायिक संधींविषयी प्रश्न
जाहिरात विषयी प्रश्न

# लिखाणाला सुरुवात करण्यापूर्वी:

**"मराठीसृष्टी डॉट कॉम"**वर आपले स्वागत आहे. आपण या वेबपोर्टलवर लेखक म्हणून नोंदणी केल्याबद्दल अभिनंदन !

आता आपण आपल्या आवडीच्या कोणत्याही विषयावर या पोर्टलवर लिखाण करु शकता आणि हजारो वाचकांपर्यंत पोहोचू शकता. आपण इंटरनेटवरील एखाद्या वेबसाईटवर लिहित असाल तर आपल्याला बऱ्याच तांत्रिक बाबींची माहिती असेलच. मात्र आपण आतापर्यंत कोठेही ऑनलाईन लिखाण केले नसेल तरीही "**मराठीसृष्टी**"वर लिखाण करणे आपल्याला अजिबात कठीण जाणार नाही.

आपण आपले लेखन मराठी युनिकोड फॉन्टमध्ये थेट मराठीसृष्टीवर करु शकता. जर थेट टायपिंग आपल्याला शक्य नसेल तर आपल्या संगणकावरील फाईलमध्ये टाईप केलेला मजकूर आपण येथे कॉपी-पेस्टही करु शकाल. या पोर्टलवर लिहिताना आपल्याला तंत्रज्ञानविषयक बंधनांना सामोरे जायला लागणार नाही.

आपण तर मराठीसृष्टीवर लेखक म्हणून नोंदणी केलेली आहेच. आपल्या परिचितांपैकीही कोणी लिखाण करत असतील तर त्यांनाही आमंत्रित करा... नोंदणी प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. मुख्य म्हणजे नोंदणी संपूर्णत: मोफत आहे.

मराठीसृष्टीचे सध्या सुमारे ४,५०,००० हून जास्त नोंदणीकृत वाचक सभासद आहेत. आतापर्यंतच्या २५ हून जास्त वर्षांच्या प्रवासात सुमारे ५,००० हून जास्त जणांनी लेखक म्हणून नोंदणी केली आहे. काळाच्या ओघात काहींनी लिखाण बंद केले असेल तर काही नवीन लेखक येथे आले असतील.

लेखक म्हणून नोंदणी करणाऱ्या सभासदांना वेबपोर्टलवर लिहिण्यासाठी सर्व प्रकारची मदत उपलब्ध करुन दिली जाते. मराठीत उपलब्ध असलेल्या विविध सॉफ्टवेअर सुविधांची माहिती नोंदणीकृत लेखकांना वेळोवेळी पाठविली जाते. अनेक चांगल्या सॉफ्टवेअरवर तसेच विविध विषयांवरील पुस्तकांवर नोंदणीकृत सभासदांना भरघोस सवलत दिली जाते.

युनिकोडमध्ये मराठीत टाईप करण्यासाठी सर्वसाधारणपणे सर्वच वेबसाईटसवर केवळ एखादाच किबोर्डचा पर्याय उपलब्ध असतो. मराठीत अनेक प्रकारचे किबोर्ड प्रचलित असून यांचे अजूनही प्रमाणीकरण झाले नाही. त्यामुळे ज्याला-त्याला आपल्या परिचयाच्या आणि आवडीच्या किबोर्डमध्ये काम करता यावे याची सोय मराठीसृष्टीने दिली आहे. सध्या इंग्लिश फोनेटिक, गमभन फोनेटिक आणि इन्स्क्रिप्ट या किबोर्डद्वारे काम करण्याची सोय पोर्टलवर उपलब्ध आहे. इतर वेबसाईटस आणि मराठीसृष्टी यात हाच फार मोठा फरक आहे.

ज्यांना गुगल किंवा मायक्रोसॉफ्ट ट्रान्सलिटरेशन सुविधेद्वारे मराठीत काम करण्याची सवय आहे त्यांना गमभन कीबोर्ड जवळचा वाटेल. ज्यांना गेली अनेक वर्षे प्रसिद्ध असलेल्या लोकसत्ता फॉन्टफ्रिडम तसेच आकृती वगैरे सॉफ्टवेअरमध्ये काम करण्याची सवय आहे त्यांना इंग्लिश फोनेटिक हा किबोर्ड सोपा वाटेल.

ज्यांना कोणत्याही मराठी किबोर्डची सवय नाही किंवा जे मराठीत टायपिंग करायला कधीही शिकलेले नाहीत त्यांना हे दोन्ही किबोर्ड शिकण्यासाठी केवळ दोन तास पुरेसे आहेत. मराठीत टायपिंग करायला शिकण्यासाठी सर्व प्रकारची मदतही मराठीसृष्टीवर उपलब्ध आहे. मराठीत काम करताना कोणत्या अक्षरासाठी कोणत्या Key चा वापर करावा याची व्यवस्थित माहिती Typing Help मध्ये उपलब्ध आहे.

त्याचप्रमाणे आपल्याकडे असलेल्या कोणत्याही युनिकोड सॉफ्टवेअरचा वापर करुन मराठीत लिहिणेही येथे शक्य आहे. आपण जर गुगलवर उपलब्ध असलेली मराठी टायपिंगची सोय वापरत असाल तर त्याच पद्धतीने मराठीसृष्टीवरही लिहिणे शक्य आहे. अशा प्रकारे विविध किबोर्ड आणि सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मराठीत टायपिंग करण्याची सोय करुन देणारे हे कदाचित पहिले व एकमेव पोर्टल असेल.

आपल्याला युनिकोडमध्ये लिखाण करणे शक्य नसेल किंवा काही कारणाने करायचे नसेल तर त्यासाठीही उपाय आमच्याकडे आहे. आपल्याला मराठी टायपिंगचा कंटाळा असेल तरीही काळजी करण्याचे कारण नाही. आपण आपला लेख चक्क मराठीत बोलूनही टाईप करु शकता.. कसा.. ते पुढे बघूयाच !!

# पोर्टलवर प्रवेश आणि डॅशबोर्ड ( Log In & Dashboard ) :

मराठीसृष्टीवर लेखन करण्यासाठी आपल्याला लॉग-इन करावे लागेल. खाली दाखवलेल्या "**मराठीसृष्टीवर लॉग-इन करा**" या लिंकवर क्लिक करुन आपण लॉग-इनच्या पानावर येऊ शकता.





लॉग-इन करण्यासाठी आपण आपले युजरनेम, किंवा नोंदणी केलेला इ-मेल आयडी वापरु शकता.

आपण लॉग-इन केल्यावर सर्वप्रथम आपल्याला मराठीसृष्टीच्या डॅशबोर्डवर (Dashboard) नेले जाईल.

लेख वाचणे किंवा प्रतिक्रिया देणे यासाठी लॉग-इन करण्याची आवश्यकता नाही.

डॅशबोर्डवर आपल्याला मराठीसृष्टीवर लिखाण करण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध आहेत. येथेच आपल्याला एक व्हिडिओ पहाता येईल ज्यामध्ये आपला मराठीसृष्टीवरील वावर अतिशय सोपा करण्यासाठी सूचना दिल्या आहेत. आपण मराठीसृष्टीवर पहिल्यांदाच आले असाल तर हा व्हिडिओ नक्की बघा.





आपण जर लॉग-इन असाल आणि मराठीसृष्टीच्या कोणत्याही पानावर असाल तर आपल्याला ब्राऊझरच्या सर्वात वरच्या भागात मराठीसृष्टीचा एडमिन बार दिसेल. खाली दिलेल्या चित्रातील काळ्या रंगाच्या पट्टीत हा Admin Bar दिसत आहे.




डॅशबोर्डवर आपल्याला दिलेल्या विविध लिंक्स आणि ऑप्शन्सचा वापर करुन आपण आपल्या लेखांची सूची बघणे, नवीन लेख लिहिणे, आधी लिहिलेला लेख संपादित करणे वगैरे कामे करु शकाल.

# लेखनासाठी विविध सुविधा..

आपण लॉग इन केल्यानंतर सर्वप्रथम डॅशबोर्डवर याल. येथे डाव्या बाजूला आपल्याला Menu दिसेल. यामध्ये **लेख** या लिंकवर क्लिक केल्यास आपल्या सर्व लेखांची सुची तिथे दिसेल. नवीन लेख लिहिण्यासाठी **नवीन लेख लिहा** या लिंक वर क्लिक करा. येथे आपल्याला खालील चित्रात दाखवल्याप्रमाणे एक एडिटर दिसेल.




आपण MS Word वगैरेसारख्या एडिटरशी परिचित असालच. त्यामुळे हा एडिटर वापरणे आपल्याला कठीण जाणार नाही.



मराठीत लेखन करण्याची सोय आम्ही एडिटरमध्येच समाविष्ट केली आहे. यासाठी आपल्या एडिटरच्या वरच्या भागात आपल्याला अनेक आयकॉन्स दिसतील. यातील योग्य ते आयकॉन वापरुन आपण सहजपणे मराठीत टायपिंग करु शकाल. आपल्याला हवा असलेल्या किबोर्डवर क्लिक करा आणि मराठीत लिहायला सुरुवात करा. मराठीत टायपिंग करणे अतिशय सोपे असून त्यासाठीची सर्व मदत आपल्याला मराठीसृष्टीवर उपलब्ध आहे.

आता आपण मराठीमध्ये आपल्याला हवा असलेला मजकूर टाइप करण्यासाठी सज्ज आहात. वर दाखवलेल्या कीबोर्ड ऑप्शन्सपैकी कोणताही एक आपण निवडू शकता. आणि आतातर आपण **चक्क मराठीत बोलूनसुद्धा आपल्याला हवा तो मजकूर टाईप करु शकता** आणि तिथल्यातिथे एडिटसुद्धा करु शकता... कसं.. ते पुढच्या भागात बघूया... !




हा आहे आपल्याला परिचित असलेला **फॉन्टफ्रिडमचा इंग्लिश फोनेटिक किबोर्ड.** आपण जसं इंग्रजीत बोलतो तसंच इथे टाईप करायचं. अगदी सोप्पं !!!





हा आहे **गमभन किबोर्ड.** आपण जसं इंग्रजीत स्पेलिंग लिहितो तसंच 'टाईप करायचं. आपण गुगल टायपिंग करत असाल तर हा तुम्हाला जवळचा वाटेल.



संगणकाच्या सुरुवातीच्या काळाला बरेच लोक **इन्स्क्रिप्ट कीबोर्ड** वापरत असत. त्यामुळे त्यांच्या सोयीसाठी हा सुद्धा येथे दिला आहे




आपण जर गुगल टायपिंगला सरावलेले असतात किंवा इतर कोणताही वापरत असाल तर इथे इंग्लिश **कीबोर्ड** सिलेक्ट करा आणि आपण वापरत असलेल्या त्या सॉफ्टवेअरमधून टाईप करायला सुरुवात करा.




कीबोर्डस च्या बाजूला आयकॉन आहे **व्हॉइस टायपिंगचा.** ह्यावर क्लिक केल्यास माईक सुरू होतो. काहीवेळा आपल्याला माईक वापरायला ब्राउझरला परवानगी द्यावी लागते. यासाठी Allow या बटणावर क्लिक करा. आता तो माईकचा आयकॉन फ्लॅश व्हायला सुरुवात होईल.

# व्हॉईस टायपिंग (Voice Typing)

**“मराठीसृष्टी”** वेब पोर्टलवर आम्ही नेहमीच लेखकांना वेगवेगळ्या अत्याधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न करत असतो. यापैकीच एक सुविदा, जी इतर कोणत्याही पोर्टलवर मिळणार नाही.. ती म्हणजे **व्हॉईस टायपिंग** !!

आता या एडिटरमध्ये आपण चक्क बोलून आपल्याला हवे ते टाईप करू शकता. त्याचप्रमाणे वेगवेगळे कीबोर्ड वापरून टाईप झालेला मजकूर दुरुस्तही करू शकता.




किबोर्डस च्या बाजूला आयकॉन आहे व्हॉइस टायपिंगचा. ह्यावर क्लिक केल्यास माईक सुरू होतो. काहीवेळा आपल्याला माईक वापरायला ब्राउझरला परवानगी द्यावी लागते. यासाठी Allow या बटणावर क्लिक करा. आता तो माईकचा आयकॉन फ्लॅश व्हायला सुरुवात होईल.

आता आपला कर्सर एडिटरमध्ये आणा. आणि बोलायला सुरुवात करा. आपण बोललेला शब्दसमूह किंवा वाक्य वरच्या एका विंडो मध्ये टाईप होताना दिसेल. आपले बोलणे थांबल्यावर आपण ज्याठिकाणी आपला कर्सर ठेवला असेल तिथे हा मजकूर जाऊन पडेल.

आपण बोलण्यामध्ये मोठा पॉझ घेतल्यास, किंवा फार जलदपणे बोलल्यास कदाचित त्यात काही चुका होण्याची शक्यता आहे. काही शब्द कदाचित टाईप होणार नाहीत किंवा चुकीच्या पद्धतीने टाईप होतील. ते बदलण्यासाठी येथेच आपण आपल्याला हवा तो कीबोर्ड वापरू शकता. म्हणजेच टायपिंग आणि कीबोर्डवरून टायपिंग या दोन्ही गोष्टी आपल्याला एकाच ठिकाणी मिळतील.

येथे एक अतिशय महत्त्वाची सुचना आहे ती म्हणजे आपण चांगल्या प्रतीचा माइक वापरायला हवा. लॅपटॉपच्या इनबिल्ट माइक ऐवजी एक्सटर्नल माइक वापरल्यास उत्तम. त्याचप्रमाणे आपले उच्चार अतिशय स्पष्ट असले पाहिजेत. एखादा शब्द चुकला तर तो कीबोर्ड वापरून सुधारता येऊ शकतो. किंवा त्या शब्दाला सिलेक्ट करून आणि डिलीट करून माइक मध्ये पुन्हा तो शब्द उच्चारून टाईप करता येऊ शकतो.

*काम करत असताना व्हॉइस टायपिंग अचानकपणे बंद झाल्यास माईकच्या आयकॉन वर पुन्हा एकदा क्लिक करा म्हणजे ते पुन्हा सुरु होईल. काम करत असताना व्हॉइस टायपिंग बंद करायचे असल्यास माईकच्या आयकॉन वर पुन्हा एकदा क्लिक करा म्हणजे तो फ्लॅश होण्याचा थांबेल.*

ही सुविधा नव्यानेच सुरू केलेली आहे. या सुविधेसाठी आम्ही व्हॉईस मॉड्युल वापरले आहे. त्यात वेळोवेळी सुधारणा होत आहेत. जसजशा सुधारणा होत जातील तसा आपल्याला येथे येणारा अनुभव जास्त चांगला येऊ लागेल. आपण जसजसे आणि जितके व्हॉईस टायपिंग कराल तितकी तुमच्या आवाजाची सवय त्या सॉफ्टवेअरला होईल. जे शब्द टाइप होणार नाहीत किंवा चुकीच्या पद्धतीने टाइप होतील ते कुठेतरी सेव्ह करून ठेवा आणि आम्हाला कळवा.

# लेखाचे संग्रहण (Save, Forward etc.)





आपला लेख लिहून झाल्यावर आपण येथे तो संग्रहित करू शकता. त्याचप्रमाणे Doc File, Text File किंवा pdf File च्या स्वरूपातही तो आपल्या संगणकावर डाऊनलोड करून ठेवू शकता. आपण केलेले लेखन थेटपणे WhatsApp किंवा GMail च्या माध्यमातून इतरांना पाठवू सुद्धा शकता.

फेसबुकवर किंवा आपल्या ब्लॉगवर तसेच सोशल मीडियावर सुद्धा ते इतरांपर्यंत शेअर करू शकता.

याशिवाय इतर बऱ्याच सुविधांचा लाभ घेण्यासाठी आमच्या "**स्मार्ट ग्लोबल मराठी साहित्यिक**"
(Smart Global Marathi Sahityik—SGMS) या उपक्रमात सहभागी व्हा !

# नवीन लेख लिहिताना

नवीन लेख लिहिताना त्याचे शिर्षक, लेखाचा मुख्य भाग, सारांश आणि लेखाच्या विषयाची थोडक्यात (जास्तीत जास्त २५ शब्दात ओळख, लेखासोबत हवे असल्यास छायाचित्र, लेखासाठी वर्गवारी, टॅग्स ही सर्व माहिती नीटपणे भरा. लेखाच्या शेवटी आपले नाव जरुर लिहा.




आपण जर येथे थेट मराठीत टाईप करु शकत नसाल किंवा आपले लेख टाईप करुन तयार असतील तर आपण आपले लेख कॉपी-पेस्ट पद्धतीनेही अपलोड करु शकता. मात्र कॉपी-पेस्ट करण्याचा मजकूर जर MS Word File मध्ये असेल तर तेथून थेट कॉपी-पेस्ट करु नका. आधी तो Notepad मध्ये घ्या आणि तेथून या बॉक्समध्ये आणा. MS Word मधील मजकूर जेव्हा आपण कॉपी-पेस्ट करता तेव्हा त्यासोबत अनावश्यक टॅग्ससुद्धा आणले जातात जे आपल्या लेखाची साईझ अनावश्यकरित्या वाढवतात.

आपण जर आपला लेख Facebook किंवा WhatsApp मधून येथे Copy-Paste करत असाल तर तो Editor च्या Text Mode मध्ये जाऊन Paste करा. यामुळे अनावश्यक Tags लेखासोबत येणार नाहीत.

## आपल्या लेखांची वर्गवारी:

आपण जे लेख लिहू इच्छिता त्यांच्यासाठी योग्य ती वर्गवारी निवडा. आपण एकापेक्षा जास्त वर्गवारीसुद्धा निवडू शकता. आपल्याला योग्य अशी वर्गवारी न सापडल्यास आपण आम्हाला कळवू शकता. आम्ही ती वर्गवारी आपल्यासाठी तयार करु. अशी नवीन वर्गवारी तयार होईपर्यंत आपण तो लेख "इतर सर्व अवर्गिकृत" या विभागात ठेवावा. वर्गवारी तयार झाल्यावर तो तिथे नेता येईल.

## लेखासोबत फोटो

आपल्या लेखासोबत आपण एक किंवा जास्त फोटोसुद्धा अपलोड करु शकता. हे फोटो आपण Featured Image या लिंकवरुन किंवा Add Media हे बटण दाबून अपलोड करु शकता. लक्षात ठेवा.. हे फोटो 75 DPI पेक्षा जास्तचे नसावेत. शक्यतो १०० KB पेक्षा जास्त नसावेत. ते 4:6 या आकारात, landscape Orientation मध्ये असावेत, म्हणजेच, आडवी बाजू ६ असेल तर उभी बाजू ४ असावी. फोटोची आडवी बाजू 600 PIXEL पेक्षा जास्त नसावी. अधिक माहिती आणि नमुन्यासाठी वेबसाईटवरील Help येथे क्लिक करावे.

## लेख प्रकाशनासाठी पाठवणे

आपला लेख लिहिताना तो अपूर्ण राहिल्यास उजव्या कोपऱ्यातील "Save Draft" या बटणवर क्लिक करा. आपला लेख लिहून पूर्ण झाला असल्यास "Submit For Review" या बटणवर क्लिक करा. आपण लेख Draft म्हणून सेव्ह केला असल्यास आपण त्यावर कालांतराने काम करु शकाल. मात्र " Review" साठी सबमिट केलेले लेख आपण संपादित करु शकणार नाही.

## लेख विशिष्ट तारखेला प्रकाशित करणे

आपला लेख एखाद्या विशिष्ट दिवशी किंवा तारखेला प्रकाशित करायचा असेल तर तसे करणे आता शक्य आहे. यासाठी लेखाच्या शेवटी अआपल्याला हवी असलेली तारिख लिहा.

## प्रकाशित झालेल्या लेखात बदल करण्यासाठी :

आपल्या लेखात कोणताही बदल करायचा असल्यास त्यासाठी लेखांच्या सूचीच्या पानावर या. येथे लेखाच्या शिर्षकावर क्लिक करा. आता आपण आपला लेख संपादित (Edit) करु शकाल. मात्र Publish केला गेलेला लेख संपादित करता येणार नाही. अशा वेळी संपादक मंडळाशी संपर्क साधा.

## लेखकाची ओळख – वाचकांसाठी आपल्या प्रत्येक लेखाच्या खाली:

मराठीसृष्टीवरील प्रत्येक लेखात लेखकाची माहिती दाखवलेली असते. आपण लेखक नोंदणीसाठी फॉर्म भरताना त्यात आपली माहिती जरुर भरावी. या माहितीच्या आधारे आम्ही आपली संक्षिप्त ओळख वाचकांना दाखवू शकू. आपल्याला आपला फोटो पाठवण्यासंबंधी सूचना आमच्याकडून मिळतील. हा फोटो .jpg फाईलच्या स्वरुपात असावा. हा फोटो पासपोर्ट अआकारातला असावा. त्याचा आकार (आडवा - width) २०० पिक्सेलपेक्षा जास्त नसावा. आपली संक्षिप्त माहिती सुमारे २५-३० शब्दांमध्ये आणि विस्तारित माहिती सुमारे १०० शब्दांमध्ये लिहून Menu मधील Profile या लिंकवर क्लिक करुन तेथे upload करु शकता.

आपल्या माहितीत दिलेला इ-मेल आयडी, फोन किंवा मोबाईल क्रमांक आपल्याला पोर्टलच्या पानावर थेट दाखवायचा नसल्यास तसे करण्याची सोय आपल्याला उपलब्ध आहे. यासाठी संपादक मंडळाशी संपर्क साधा.

## पासवर्डमधील बदल:

आपण आपला पासवर्ड केव्हाही बदलू शकता. यासाठी डॅशबोर्डच्या मेनूमधील प्रोफाईल (Profile) या लिंकवर क्लिक करा. येथे आपण आपला पासवर्ड बदलू शकाल.

## पासवर्ड विसरलात?

आपण आपला पासवर्ड विसरला असाल तरीही काळजी करण्याचे काहीच कारण नाही. लॉग-इनच्या पानावरील **“पासवर्ड विसरलात? पासवर्ड बदलायचाय?”** या लिंकवर क्लिक करा. येथे आपला नोंदणीकृत इ-मेल टाईप करा. आपल्याला एक इ-मेल पाठवले जाईल ज्यात पासवर्ड बदलण्यासाठी लिंक असेल. या लिंकवर जाऊन आपण पासवर्ड बदलू शकता.

# मराठीसृष्टीची संपादकीय व कॉपीराईटबाबत धोरणे

**कॉपीराईट भंगाच्या कोणत्याही प्रकरणात मराठीसृष्टीची जबाबदारी केवळ संबंधित लेख किंवा फोटो, चित्र, व्हिडिओ वगैरे गोष्टी मराठीसृष्टी पोर्टलवरुन काढून टाकण्यापर्यंतच मर्यादित आहे. अशा प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर कारवाई कोणाकडूनही सुरु झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अशा प्रकारे कॉपीराईटचा भंग करणाऱ्या लेखकावर किंवा व्यक्तीवर असते.**

या वेब पोर्टलची रचना जितकी सोपी आहे तितकीच पारदर्शकही. या पोर्टलला संपादक मंडळ आहे मात्र कोणत्याही प्रकारची सेन्सॉरशिप नाही. संपादक मंडळाचे काम मुख्यत: सर्व लेखांच्या मॉडरेशनपुरतेच मर्यादित असते. त्याचप्रमाणे लेखांवर आलेल्या प्रतिक्रिया प्रदर्शित करणे, विविध विषयांवर स्वत: लेखन करणे, पोर्टलवरील विविध विभागांची काळजी घेणे ही संपादक मंडळाची कामे आहेत.

मराठीसृष्टीवर लिखाणाची बंधने नाहीत मात्र इथे उथळ लिखाणाला थारा नाही. वैचारिक लिखाणाचे स्वागत आहे मात्र वैयक्तिक दोषारोप, चिखलफेक यालाही थारा नाही. सर्व लेख संपादक मंडळ एकदा नजरेखालून घालते. कोणत्याही लेखात काही आक्षेपार्ह मजकूर आढळल्यास त्याबद्दल लेखकाला कळविले जाते. मजकूर बदलून पुन्हा सबमिट केल्यावर संपादक मंडळ तो प्रदर्शित करते. या प्रक्रियेमुळे काही वेळा आपण लिहिलेला एखादा लेख प्रदर्शित होण्यास वेळ लागू शकतो.

मराठीसृष्टीचे सर्व लेखक विचाराने प्रगल्भ आहेत. आम्हाला अभिमान आहे की आमच्याकडे आतापर्यंत आलेल्या हजारो लेखांपैकी अक्षरश: हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लेख आम्हाला नाकारावे लागले आहेत.

आम्हाला आणखी एका गोष्टीचा अभिमान आहे की मराठीसृष्टीवर प्रकाशित होणारे लेख वैचारिक स्वरुपाचे आहेत. कविता, वात्रटिका आणि विनोद वगळता जवळपास सर्व लेख किमान २०० शब्दांचे आहेत. एखाद्या ब्लॉग किंवा फोरम साईट किंवा सोशल नेटवर्किंग साईटवर होत असलेले १५-२० शब्दांचे उथळ लेखन मराठीसृष्टीवर होत नाही.

एखाद्या धर्माच्या, पंथाच्या, समुहाच्या किंवा देशाच्या भावनांना धक्का पोहोचवेल अशा प्रकारच्या कोणत्याही लेखनाला मराठीसृष्टीवर स्थान नाही. जातिवाचक मजकूर, बदनामीकारक मजकूर यासारख्या गोष्टींनाही इथे थारा नाही.

सध्या सोशल मिडियावरुन अनेक लेख फॉरवर्ड केले जातात. त्यामध्ये अनेकदा लेखकाचे नाव नसते किंवा Forwarded Post असे लिहिलेले असते. असे लेख मराठीसृष्टीवर आल्यास ते ज्यांनी पाठवले आहेत त्यांच्या नावाने प्रकाशित केले जातात. मात्र अशा लेखांच्या बाबतीत पुराव्यांसह काही तक्रारी आल्यास ते लेख येथून काढून टाकले जातात.

आपल्या लेखासाठी चित्रे, छायाचित्रे निवडताना आपण सजग रहावे. आपल्या लेखांमध्ये काही वेळा इतर वेबसाईटसवरील लेखांचा संदर्भ असल्यास त्याबाबतचे योग्य ते श्रेय त्या त्या वेबसाईटला द्यावे व त्यांचा उल्लेख करावा. काही प्रसंगी बाहेरील वेबसाईटवरील लेखांचा संदर्भ देणे आवश्यक असल्यास त्या लेखाला लिंक्स देण्यास काहीच हरकत नाही कारण इंटरनेट हे असेच एका लिंकमधून दुसरी लिंक अशाच प्रकारे बनले आहे.

मराठीसृष्टीवरुन बऱ्याचदा विविध वृत्तपत्रातील बातम्यांना किंवा लेखांना लिंक असतात. अशा लिंक्स देताना त्या बातमीचा किंवा लेखाचा सारांश आम्ही मराठीसृष्टीवर ठेवतो आणि त्यानंतर पूर्ण वाचन करण्यासाठी वाचकाला त्या वेबसाईटवर पाठवतो. यात कॉपीराईटचा भंग होत नाही.

आपण मराठीसृष्टीवर लेखन करताना येथे उल्लेखलेल्या नियमांचे व्यवस्थित पालन केल्यास कोणतीही अडचणीची वेळ येणारच नाही.

कॉपीराईटच्या बाबतीत आम्ही अत्यंत जागरुक आहोत. कोणत्याही प्रकारचा कॉपीराईट भंग आम्ही सहन करत नाही. एखाद्या लेखात कोणाच्या कॉपीराईटचा भंग झाल्याचे पुराव्यासहित आमच्या निदर्शनाला आणले गेले तर तो लेख लवकरात लवकर पोर्टलवरुन

काढण्याची कारवाई आम्ही करतो. मात्र तक्रार करणाऱ्याने पुरेसा पुरावा उपलब्ध करणे आवश्यक आहे. उगाचच कोणत्याही पुराव्याशिवाय आलेल्या तक्रारींना आम्ही महत्त्व देत नाही आणि अशा अशा परिस्थितीत आम्ही आमच्या लेखकांचीच बाजू घेतो.

आमचे संपादक मंडळही कॉपीराईट भंगाच्या बाबतीत नेहमीच दक्ष असते. इंटरनेटचा पसारा आणि जगभरातल्या कोट्यावधी वेबसाईटस बघितल्या तर कोणता मजकूर, चित्र, फोटो, व्हिडिओ वगैरे कोणत्या साईटवरुन उचललेला आहे काय हे तपासणे साक्षात् ब्रह्मदेवालाही शक्य नाही. एखाद्या लेखात कोणत्याही कॉपीराईटचा भंग झाल्याचे संपादक मंडळाच्या निदर्शनास आले तर त्याबाबत लेखकाला सूचना दिली जाते. अशा प्रकारचा लेख पोर्टलवरुन काढून टाकण्याचीही कारवाई केली जाते.

**मी लिहिलेल्या लेखाचे स्वामित्त्वहक्क कोणाकडे रहाणार?**

वाचकांनी स्वत:हून विनामोबदला लिहिलेल्या लेखांचे स्वामित्त्वहक्क वाचकांकडेच असतील. मात्र मराठीसृष्टीच्या इतर वेबसाईटस, नियतकालिके, न्युजलेटर्स, इ-पुस्तके इत्यादिमध्ये हे साहित्य वापरण्याचे अधिकार मराठीसृष्टीकडे असतील. मराठीसृष्टीने आमंत्रित करुन आणि मानधन देउन करुन घेतलेल्या लेखांचे स्वामित्त्वहक्क मराठीसृष्टीकडेच असतील.

**मराठीसृष्टीवर पाठवल्या जाणाऱ्या लेखांमध्ये कॉपीराईटचा भंग होत नाही हे आपण तपासता काय?**

आमचे संपादक मंडळही कॉपीराईट भंगाच्या बाबतीत नेहमीच दक्ष असते. मात्र इंटरनेटचा पसारा आणि जगभरातल्या कोट्यावधी वेबसाईटस बघितल्या तर कोणता मजकूर, चित्र, फोटो, व्हिडिओ वगैरे कोणत्या साईटवरुन उचललेला आहे काय हे तपासणे साक्षात् ब्रह्मदेवालाही शक्य नाही. एखाद्या लेखात कोणत्याही कॉपीराईटचा भंग झाल्याचे संपादक मंडळाच्या निदर्शनास आले तर त्याबाबत लेखकाला सूचना दिली जाते. अशा प्रकारचा लेख पोर्टलवरुन काढून टाकण्याचीही कारवाई केली जाते.

**आपल्याकडे दिल्या गेलेल्या लेखात कॉपीराईटचा भंग झाल्यास आपण काय कारवाई करता?**

एखाद्या लेखात कोणाच्या कॉपीराईटचा भंग झाल्याचे पुराव्यासहित आमच्या निदर्शनाला आणले गेले तर तो लेख लवकरात लवकर पोर्टलवरुन काढण्याची कारवाई आम्ही करतो. कॉपीराईट भंगाच्या कोणत्याही प्रकरणात मराठीसृष्टीची जबाबदारी केवळ संबंधित लेख किंवा फोटो, चित्र, व्हिडिओ वगैरे गोष्टी मराठीसृष्टी पोर्टलवरुन काढून टाकण्यापर्यंतच मर्यादित आहे. अशा प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर कारवाई कोणाकडूनही सुरु झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अशा प्रकारे कॉपीराईटचा भंग करणाऱ्या लेखकावर असते.

**कॉपीराईटचा भंग होणार नाही यासाठी काय काळजी घेता येईल?**

आपण मराठीसृष्टीवर लेखन करताना कॉपीराईटसंबंधी नियमांचे व्यवस्थित पालन केल्यास कोणतीही अडचणीची वेळ येणारच नाही. आपल्या लेखासाठी चित्रे, छायाचित्रे निवडताना आपण सजग रहावे. आपल्या लेखांमध्ये काही वेळा इतर वेबसाईटसवरील लेखांचा संदर्भ असल्यास किंवा छायाचित्राचा वापर केल्यास त्याबाबतचे योग्य ते श्रेय त्या त्या वेबसाईटला द्यावे व त्यांचा उल्लेख करावा. काही प्रसंगी बाहेरील वेबसाईटवरील लेखांचा संदर्भ देणे आवश्यक असल्यास त्या लेखाला लिंक्स देण्यास काहीच हरकत नाही कारण इंटरनेट हे असेच एका लिंकमधून दुसरी लिंक अशाच प्रकारे बनले आहे. यामध्ये कॉपीराईटचा भंग होत नाही.

**लेखामध्ये बाहेरील वेबसाईटला लिंक दिली असल्यास कॉपीराईटचा भंग होतो काय?**

इंटरनेट हे असंख्य लिंक्सने बनलेले एक आश्चर्य आहे. इतर साईटसप्रमाणेच मराठीसृष्टीवरुनही बऱ्याचदा विविध वृत्तपत्रातील बातम्यांना किंवा लेखांना लिंक असतात. अशा लिंक्स देताना त्या बातमीचा किंवा लेखाचा सारांश आम्ही मराठीसृष्टीवर ठेवतो आणि त्यानंतर पूर्ण वाचन करण्यासाठी वाचकाला त्या वेबसाईटवर पाठवतो. यामध्ये कॉपीराईटचा भंग होत नाही.

# अधिक माहितीसाठी....

मराठीसृष्टी वेब पोर्टलबद्दल अधिक माहिती, आपल्या मनात असलेले कोणतेही प्रश्न.. यांच्या उत्तरासाठी वेबपोर्टलवरील संबंधित विभागाला भेट द्या.

त्यानंतरही आपल्याला कोणतीही शंका असल्यास आमच्या संपादक मंडळाशी किंवा सपोर्ट टिमशी संपर्क करा...


**संपर्क:**

## मराठीसृष्टी डॉट कॉम

चाणक्य, २ रा मजला, क्लासिक प्लाझाच्या मागे, गोखले रोड, नौपाडा, ठाणे ४००६०२.

**दूरध्वनी:** / ९८२०३ १०८०३ | **WhatsApp** : 9820310803

**इ-मेल :** support@marathisrushti.com | **वेब :** www.marathisrushti.com

**फेसबुक** : www.facebook.com/marathisrushti